# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. प्राची परचुरे वैद्य

मनातील भावना असावी कोणतीही
संगीताने होई वाट मोकळी
भावभावनांचे अचूक स्पंदन
दूर करते अंतरीची पोकळी

जिथे पोचत नाहीत शब्द
तिथे पोचते संगीत
संगीतातील राग, लय
करिती व्याधींवर मात

'सा'ते'सां'या सप्तसुरात
असे जादू अनाकलनीय
संगीताचे असती सर्व चाहते
सुजग जीवनास तरणोपाय

नसता संगीत आयुष्यात
जीवन नीरस होऊन जाते
आयुष्य अजूनच मग
गंभीरतेकडे झुकले असते

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

संगीताची अनमोल देणगी
दिली आपणास ईशाने
आभार मानावे त्याचे
कृतार्थ होऊन प्रत्येकाने

काळ असो कोणताही
संगीताचे सप्तसूर
त्याची गोडी तशीच
राहते मनांमनावर

मनावरील ताण
करितो संगीत दूर
त्याच्याच आधारावर
होते जीवननैय्या पार

तरुण असो वा वृद्ध
भावते त्यास संगीत
असा माणूस असे विरळा
ज्यास भावत नाही गीत

'सा'ते 'सां' हे सप्तसुर
असती जीवनाचे सार
सुखादु:खाच्या क्षणी
करते संगीत जीवन पार

Anahat Music Therapy

क्षण असो कोणताही
संगीत असे तिथे
समजून येते त्यास
भाव असे जिथे

जीवनाचे चार क्षण
घालवावे संगीतात
अशी जमवावी मैफल
येईल त्यात रंगत

'सा' ते ' सां' या सप्तसुरात
होती अनंत राग
काही शुद्‍ध काही कोमल
पण असती एकच भाग

सुखदु:खाच्या क्षणी
मित्रच असे आपुला
सुरांच्या मदतीने
मनास सोबती मिळाला

गाणाऱ्या गायकास
असती आशीर्वाद देवाचे
आपल्या गोड गळ्याने
मन रिझवतो प्रेक्षकांचे

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

कोणी गातात बाथरूममध्ये
तर कोणी गातात मैफिलीत
भाव असे मात्र सारखा
त्या स्वरांच्या प्रीतीत

सप्तसुरांसाठी जगणारे
गायक असती निराळे
आयुष्यभर करती पूजा
असती सर्वांहून वेगळे

नसता संगीत आयुष्यात
जीवन होई नीरस
रोजच्या जीवनात
संगीत असे खास

जसा महत्वाचा असे
शरीराचा प्रत्येक अवयव
तसे संगीत असते खास
दिसतो त्यात मनाचा भाव

जीवन जगण्याचे साधन
संगीत असे जीवनाचा भाग
नाकारू ना कोणी शकत
दूर होती जर्जर रोग

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

वैद्यांनीही आजकाल
रुग्णांसाठी सुरु केली
संगीताची नवी थेरपी
जी रुग्णांना उपयुक्त झाली

दुर्धर आजार होती दूर
नैराश्य जाई पळून
म्युझिक थेरपी घेऊन
आयुष्यास मिळे वरदान

संगीत एक असे शास्त्र
नाही कसेही वापरत
दिवसाचे जसे चार प्रहर
तसे संगीताचे राग असतात

सुमधुर संगीत सुर
ऐकताच सकाळच्या प्रहरी
चैतन्यमय होऊन जाते
तनमन दिवसभरी

संगीताची आराधना
ही सरस्वतीची उपासना
प्रसन्न करूया तिज
करून तिची प्रार्थना

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

शब्दसुरांशी जुळवून मैत्री
होऊ आनंदी जीवनी
रोजच्या धावपळीत
संगीत पडो रोज कानी

आहे जीवन संगीत
सात सुरांची मैफल
रंग भरूया त्यातच
करूया आयुष्य सफल

नऊ रस ज्यात असती
असे हे आहे संगीत
देती जीवनी आनंद
करूनी संकटावर मात

असे जीवन संगीत
गात हसत जगूया
वैरभाव विसरूनी
आनंद सर्वांस देऊया

सुखदु:ख सोबतीला
कायमच असतील
संगीतासारखी मैत्रीण
त्याचा उपाय होईल

Anahat Music Therapy

सप्तरसुरांच्या झुल्यावर
अलगद जावे बसूनी
फिरुनी यावे स्वछंदी
मनमोकळे होऊनी

एकेक सूर उलगडताना
मनाची कळी उलगडते
स्वतःच्याच अस्तित्वाचा
आभास ते देऊनी जाते

नव्या सुरांचे नवे गीत व्हावे
सूर आणि शब्द एकरूप व्हावे
शब्दांचा भावनेशी मिलाप होता
मी संगीतमय होऊन जावे

संगीत जरी असला छंद
तरी टाकतो मोहुनी मन
या सुराचे त्या सुरावर
गुंगून टाकतो आपुले भान

भावनांचे मोकळे आकाश
घडे या संगीताने
काय असे यात जादू
कशी घडवली निर्मात्याने ?

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

सुरात सूर मिसळूनी
गाऊ संगीत गोड नवे
जीवन नसते नुसते कोडे
त्याचा स्वाद घेऊनी जगावे

सप्तसुरांच्या बंधनात
बांधूनी घ्यावे स्वतःला
मैफिलीत जावे रंगूनी
जावे विसरुनी विश्वाला

अंतरात्माचा आवाज संगीत
देवाचेच रूप भासते मज
आशीर्वचन घेऊन त्याचे
चढवू सुरांचा देखणा साज

निखळ आनंद मिळवून देतो
सप्तसुरांचा सुंदर मेळ
जीवनाचे मर्म सांगतो
संगीतातून निर्भेळ

संगीत हे तीन शब्द
देती जीवनास अर्थ
संगीताची ज्यास नावड
त्याचे जीवन व्यर्थ

Anahat Music Therapy